**पुरावा सुरू होण्याची वेळ – दुपारी १२.४१ वाजता.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.६**

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांवः **अनिल कारभारी खताळ,**

वयः– ५४ वर्षे, व्यवसायः– नोकरी,

राहणारः संगमनेर शहर पोलीस स्टेशन, ता.संगमनेर, जि. अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. एम. ठाकुर यांचेकडूनः–**

१. सन २०२३ मध्ये मी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात वाहतुकीबाबत नेमणुकीस होतो. दिनांक १६.०६.२०२३ रोजी ०९.३० वाजता आमदार बाळासाहेब थोरात यांच्या बंगल्यावर माझी नेमणुक होती. बाळासाहेब थोरात यांच्या विरोधात ठिया आंदोलन असल्यामुळे माझी नेमणुक झाली होती. ११.३० वाजता मला बाळासाहेब थोरात यांच्या बंगल्यावर नेमणुकीस असतांना जाणता राजा मैदान येथुन बसस्थानकाकडे मोर्चा चालला होता. मी जाणता राजा मैदान नसल्यामुळे तिथे काय झाले हे मला माहिती नाही. परंतू शाई फेकण्याचे मला नंतर कळाले. माझ्या समोर काहीच झाले नाही. दिनांक ०६.०६.२०२३ रोजी मी सुट्टीवर होतो. मला घटना घडल्यानंतर गणपुले यांनी आंदोलन केल्याचे व ते आंदोलन न करण्याबाबत आदेशाबाबत माहिती मिळाली. परवानगी नाकारल्याची ए. एस. आय. यादव यांनी तोंडी नोटीस बजावली होती. असे घडले नाही की, माझ्यासमक्ष आंदोलकांनी ठिया आंदोलनात प्लॅस्टीकच्या पाईपला बारदाणे गुंडाळून त्यावर आमदार बाळासाहेब थोरात यांचे रंगीत फोटो लावून त्यावर काळी शाई माझ्या हजेरीत लावली. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी त्यावेळी आमदार बाळासाहेब थोरात यांच्या बंगल्यावर नेमणूकीस होतो व मला घटना नंतर कळाली.

**सरकारी वकिलांनी साक्षीदाराला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी दिली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०६.२०२३ रोजी ११.०० वाजता संगमनेर शहरात श्रीराम गणपुले यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने सकल हिंदू

समाजाचा आपमान केल्याच्या निषेधार्थ आमदार बाळासाहेब थोरात यांच्या विरोधात आंदोलन केले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४.०६.२०२३ रोजी आंदोलनासाठी परवानगी मागीतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या निवासस्थानाच्या समोरून सदर आंदोलनातील लोकं जाणार होते. हे म्हणणे खरे आहे की, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व कॉंग्रेसचे कार्यकर्ते यांच्यात वाद होऊ नये म्हणून पोलीस महासंचलक यांनी कोणत्याही आंदोलनास परवागनी देवू नये असा आदेश पारीत केला होता. हे म्हणणे खरे आहे की, गणपुले यांना तोंडी कळविण्यात आले होते की, आंदोलनास परवानगी नाकारलेली आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, यादव यांनी स्वतःच्या मोबाईलवरून गणपुले यांच्या मोबाईलवर नोटीस देऊन मोर्चास परवानगी नाकारल्याचे कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आंदोलकांनी वरिष्ठांशी चर्चा करून मोर्चा रद्द करून सकाळी ११.१० वाजता ठिया आंदोलन चालू केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर आंदोलकांनी बाळासाहेब थोरात यांच्या निषेधाचे फलक हातात धरून घोषणाबाजी केली. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम गणपुले, सतिष कानडे, अशोक इथापे, अमोल ठकाळ, वैभव लांडगे, भिमराज चत्तर, भरत फटांगरे, दिनेश सोमानी, राहुल भोईर, हरिश्चंद्र चकोर व इतर प्रमुख नेत्यांनी भाषणे देऊन निषेध व्यक्त केला. हे म्हणणे खरे आहे की, त्या आंदोलनात ३५ ते ४० कार्यकर्ते सहभागी होते. हे म्हणणे खरे नाही की, पाठीमागुन प्लॅस्टीकचा पाईप काढून त्यावर बारदाणा लावून आमदार बाळासाहेब थोरात यांच्या रंगीत चित्रावर शाई लावण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५.०६.२०२३ ते दिनांक १९.०६.२०२३ या दरम्यान प्रतिबंधात्मक आदेश लागू केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीचे अथवा पुतळयाचे दहन करण्यास व प्रसिध्दी करण्यास मनाई होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर आदेश असतांनाही आरोपींनी व त्यांच्यासोबत असलेल्या इतर कार्यकर्त्यांनी जमाव जमवून काळी शाई टाकून आमदार बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात निषेध व्यक्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, संपुर्ण घटना माझ्यासमक्ष घडली. पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही. मला आता माझ्या जबाबातील अधोरेखीत भाग अ वाचून

दाखविण्यात आला. मी वरील दिलेल्या साक्षीच्या व्यक्तीरिक्त जबाबातील इतर सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. १,२, ५ ते १९ तर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. व्यवहारे यांचेमार्फत–**

४. जाणता राजा मैदान हे थोरात यांच्या बंगल्यापासून ५०० मिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, थोरात साहेब यांच्या बंगल्यापासून जाणता राजा मैदान येथे काय घडत आहे हे दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडल्यानंतर मला आंदोलनाबाबत व मैदानात काय घडले याबाबत समजले. हे म्हणणे खरे आहे की, गणपुले यांनी परवानगी मागीतली, त्यांना परवानगी नाकारली व त्यांनी आंदोलन केले या घटना माझ्यासमक्ष घडलेल्या नाहीत.

**उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्रीमती एस. एस. मांढरे यांचेमार्फत–**

५. वरील उलटतपास मान्य केला.

**उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. ए. ए. महांडुळे यांचेमार्फत–**

६. वरील उलटतपास मान्य केला.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

Digitally signed by GAJANAN GULABCHAND SONI
Date: 2026.05.26 15:37:29 +0530

Digitally signed by GAJANAN GULABCHAND SONI
Date: 2026.05.26 15:37:37 +0530

(जी. जी. सोनी) (जी. जी. सोनी)

अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,न्या.क्र.१०, अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,न्या.क्र.१०,

अहमदनगर. अहमदनगर.

दिनांकः २६/०५/२०२६

**पुरावा संपल्याची वेळ – दुपारी ०१.०६ वाजेपर्यंत.**

**कोर्ट नोट– व्ही.सी.गुगलच्या सहाय्याने पुरावा नोंदविण्यात आला व व्हीडिओ फाईल डाऊनलोड फोल्डरमध्ये जतन करून ठेवण्यात आली.**